# ई - पोलीस पत्रिका

दि. २६/०८/२०२४ अनु.क्र.१५४

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/सेवानिवृत्त रजा/७१७०/२०२४ अमरावती शहर दिनांक ०७/०८/२०२४**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या दिनांकास नियत वयोमानाने सेवानिवृत्त होणार असल्याने त्यांनी सेवानिवृतिपुर्व रजा मंजुरी बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | नियत वयोमानाने सेवानिवृत्त दिनांक | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/८९४,संजय भोगावकर | विशेष शाखा | दि.२८/०२/२०२५ | ३० दिवस |
| २ | पोहवा/११११,बंन्सी भटकर | विशेष शाखा | दि.३०/११/२०२४ | ३० दिवस |
| ३ | सपोउपनि/८३५,काशीप्रसाद गौतम | विशेष शाखा | दि.३१/१२/२०२४ | ३० दिवस |
| ४ | सपोउपनि/१४८६,सुभाष गवई | मोपवि | दि.३१/१०/२०२४ | ३० दिवस |
| ५ | पोहवा/१०३३,मिर फैजुल्ला हुसेन रिझवी | गाडगेनगर | दि.३१/०१/२०२५ | ३० दिवस |

उपरोक्त पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६६ (१) तरतुदीनुसार आणि प्रशासकीय कामाची निकड व त्यांचे सेवेची आवश्यकता विचारात घेवुन वरील प्रमाणे सेवानिवृत्तीपुर्व रजा मंजुर करण्यात येत आहे.तरी त्यांना यापुढे रजा वाढवुन देण्यात येणार नाही हयाची नोंद घ्यावी.

**२.पोआअ/आस्था-५/वेतन स्थगिती/७४८८/२०२४ अमरावती शहर दिनांक २०/०८/२०२४**

**संदर्भ :-** पोलीस निरीक्षक,नियंत्रण कक्ष ,अमरावती शहरकडील जा.क्रमांक २२८/२०२४,
दिनांक २५/०७/२०२४

**आदेश**

पोहवा/१२०८, सुधीर मानकर, नेमणुक नियंत्रण कक्ष, अमरावती शहर हे दिनांक ०१/०४/२०२३ पासुन दिनांक २२/१२/२०२३ पर्यत २६६ दिवस रुग्णनिवेदनावर होते.दिनांक २२/१२/२०२३ रोजी कर्तव्यावर हजर झाले व पुन्हा दिनांक २१/०५/२०२४ पासुन हात व छातीचा आजार सांगुन अद्यापपावेतो कर्तव्यावर अनुपस्थित आहे. तरी त्यांना कर्तव्यावर हजर होणेबाबत नोटीस देवुन सुध्दा ते कर्तव्यावर हजर झालेले नाही.तसेच त्यांच्या सेवापटाची पडताळणी केली असता त्यांच्या खाती पुरेशी रजा शिल्लक नसल्याने अतिप्रदान होत आहे.त्यामुळे त्यांचे **माहे सप्टेंबर २०२४** पासुन ते कर्तव्यावर रुजु होईपर्यत त्यांचे मासिक वेतन तात्पुरते स्थगित करण्यात येत आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश /पोना-१११९+१/६८३२/२०२४ अमरावती शहर दिनांक २९/०७/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २१९८/२०२३, दिनांक ०९/१०/२०२३ रोजीचा गैरहजर कसुरी अहवाल.
२) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २६३९/२०२३, दिनांक २५/०९/२०२३ रोजीचा कसुरी अहवाल.
३) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस पोआअ/विचौ-२/गैरहजर/कसुरी अहवाल/का.दा.नो./पोना-१११९ सरदार + १/३६३७/२०२४, दिनांक ०४/०४/२०२४

**कसुरदारचे नाव :-** (१) पोना/१११९ रंजित सरदार, नेमणुक पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर.
(२) पोशि/४१८ रामकिसन दुधकावरे, नेमणुक पोलीस मुख्यालय,अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे कर्तव्य नेमण्यात आलेले होते.तरी तुम्ही वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दला मध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे. तसेच कसुरीच्या अनुषंगाने तुम्हाला दिनांक ३१/०१/२०२४ रोजी तत्का.मा.पोलीस उपायुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले नाही.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | पत्र क्र. दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोना/१११९ रंजित सरदार | पो.स्टे. वलगांव अम.शहर | दि.२२/०९/२०२३ रोजी चे ०९.०० ते २१.०० वा. पर्यत डिओ यांना तपास मदत करणे करीता कर्तव्य नेमण्यात आले असता वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनानिकृतपणे गैरहजर राहिले. | दि.२२/०९/२०२३ ते दि.२६/०९/२०२३ पर्यत एकुण ०५ दिवस गैरहजर. | ६०७९/२०२४, ०३/०७/२०२४ |
| ०२ | पोशि/४१८ रामकिसन दुधकावरे | पोलीस मुख्यालय अम.शहर | दि.१३/०९/२०२३ रोजी चे १०.३० वा. संभाजीनगर येथे अतिमहत्वाचे बंदोबस्त | दि.१३/०९/२०२३ ते दि.२०/०९/२०२३ पर्यत एकुण ०८ दिवस | ५३०६/२०२४, ०४/०६/२०२४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | करीता कर्तव्य नेमले असता वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता गैरहजर राहिले. | गैरहजर. | |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. १०००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर न केल्याने तुम्हाला तुमच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करणे करीता पत्राव्दारे एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तरी कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरी बाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. १०००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश /पोहवा-२२ रहीम/७०७१/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/०८/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन भातकुली, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ०१/२०२४, दिनांक ०१/०१/२०२४

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/का.दा.नो/पोहवा-२२ रहिम/११३/२०२४, दिनांक ०४/०१/२०२४

**कसुरदारचे नाव** :- पोहवा/२२ अब्दुल रहिम, तत्का.नेमणुक पोलीस स्टेशन भातकुली (सध्या नेमणुक पोलीस मुख्यालय), अमरावती शहर

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोहवा/२२ अब्दुल रहिम, तत्का.पोलीस स्टेशन भातकुली (सध्या नेमणुक पोलीस मुख्यालय), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही माहे जुन २०२३ मध्ये पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथुन पोलीस स्टेशन भातकुली येथे बदली वर हजर झाले. पोलीस स्टेशनला तपासी अंमलदार यांचे कमतरतेमुळे त्यांचेकडे गणोजादेवी व अळणगाव बिटचे बिट अंमलदार म्हणुन बिटचे कार्यभार दिले होते.तुमची बिट मध्ये नियुक्ती केल्यापासुन तुम्ही तुमच्या बिट क्षेत्रामध्ये अवैध धंदे करणारे लोकांशी हातमीळवणी करुन नविन-नविन अवैध धंदे करणारे लोकांना प्रोत्साहन देवुन नजर आळ अवैधधंदयाला पाठबळ देवुन त्यांचे कडुन लाच स्वरुपात पैसे घेवुन त्या पैश्यातुन काही पैसे स्थानिक पत्रकार व सोशल मिडीया पत्रकारांना देवुन त्यांना हाताशी घेवुन त्यांचे कडुन पोलीस स्टेशन विषयी खोटी माहिती तसेच गोपनिय माहिती ज्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा मलिन होईल, अशी बातमी देवुन सोशल मिडीया तसेच वर्तमान

पत्रात प्रसारित करण्यास तुम्ही बळ देत आहे. तसेच पोलीस स्टेशन मधील पोलीस अंमलदारांचे एकमेकांविषयी गटबाजी लावुन वाद निर्माण करण्याचे पुर्णता शक्यता दिसुन येत आहे. तसेच तुम्ही स्थानिक पत्रकार सोबत हातमिळवणी करुन पोलीस स्टेशन मधील पोलीस अंमलदार तसेच पोलीस अधिकारी यांचे डयुटी व इतर बाबतीत पोलीस स्टेशन मधील गोपनिय माहिती स्थानिक पत्रकाराला देवुन पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे डयुटीमध्ये ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न तुम्ही करता. त्यामुळे पोलीस स्टेशन मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मानसिकता खालवुन डयुटी करते वेळेस त्रास होत आहे.तसेच यामुळे वरिष्ठ पोलीस स्टेशन भातकुली येथील अधिकारी यांना सुध्दा त्रास होत आहे.

तसेच यापुर्वी सुध्दा तुम्ही पोलीस स्टेशन भातकुली येथे नेमणुकीस असतांना तुमचे असेच अवैध धंदयाना पाठबाळ देण्याचे कारणाने सन २०२० मध्ये कसुरीवर पोलीस मुख्यालय येथे बदली झाली होती. त्यानंतर तुमची पोलीस मुख्यालय येथुन पोलीस स्टेशन बडनेरा येथे बदली झाली होती. तसेच पोलीस स्टेशन बडनेरा येथुन सुध्दा तुमची प्रशासकीय कारणास्तव सन २०२३ मध्ये पोलीस मुख्यालय येथे बदली होवुन तेथुन पोलीस स्टेशन भातकुली येथे बदली होवुन पोलीस स्टेशन भातकुली येथे नेमणुकीस असतांना तुम्ही पोलीस स्टेशन भातकुली हद्दीतील अवैध धंदयाला पाठबाळ देवुन अवैध धंदेव्याल्यावर काही कार्यवाही करत नाही. व पोलीस स्टेशन भातकुली हद्दीतील अवैध धंदेवाल्यांना माहिती देवुन त्यांचेवर कार्यवाही होवु नये म्हणुन मदत करता.तसेच पत्रकारांना हाताशी घेवुन पोलीस स्टेशन हद्दीतील नविन-नविन अवैध धंदे सुरु करण्यास पाठबाळ देत आहेत.तुमच्या मुळे पोलीस स्टेशन भातकुली हद्दीतील अवैध धंदयांना पाठबाळ देण्यामुळे अवैध धंदे चालविणारे लोकांचे प्रोत्साहन वाढत आहे. ज्यामुळे जनसामाण्य लोकांमध्ये पोलीसांची प्रतिमा मलिन करण्याचे काम तुमच्यामुळे होत  आहे. तसेच तुमच्या अशा वागणुकीमुळे पोलीस स्टेशन भातकुली येथे लाचलुचपत विभागाची कार्यवाही होण्याची दाट शक्यता असुन त्यामुळे पोलीस विभागाची प्रतिमा मलिन होईल.

दिनांक ०४/१२/२०२३ चे २१.०० वा.पासुन ते दिनांक ०५/१२/२०२३ चे ०९.०० वा. रोजी पोलीस स्टेशनला रात्र पाळी मध्ये N.D.O. (१) पोहवा/८७१ राजेश बोरकुटे, यांचे सोबत (२) पोशि/१७७९ मोहम्मद सज्जाद यांची डयुटी असतांना फिर्यादी विजय जानराव धर्मासरे वय ५६ वर्ष धंदा-नोकरी मंडळ अधिकारी आसरा रा.संकेत कॉलनी, कॅम्प अमरावती यांनी पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक उमेश तायडे, पोलीस स्टेशन भातकुली यांना मिळालेल्या गोपनिय माहिती वरुन (१) पोहवा/८७१ राजेश बोरकुटे, यांचे सोबत (२) पोशि/१७७९ मोहम्मद सज्जाद यांचे सह अवैध रेती खणन वाहतुक करणा-यांवर कार्यवाही साठी गेले असता वाहनांवरील चालक मकसुद खान गुलाम युनूस खान, वय अंदाजे ३२ वर्ष रा.खोलापुर ता.भातकुली यांनी पोशि/१७७९ मोहम्मद सज्जाद यांना सांगीतले की, "मै क्या यहासे फोकट मे रेती निकाल के जा रहा हु क्या तुम्हारे बडे साहेब को पैसे देता हु मै आपको यकीन नही आ रहा तो देखलो मेरे मोबाईल के फोन पे हिस्टरी मे असे सांगीतले वरुन त्यांनी पाहिले असता फोन पे ची हिस्टरी मध्ये एक रु. ५०००/- Transation दिसत होते व त्यावर रहिम पोलीस (RP) असे दिसुन होते. तसेच तुम्ही पोलीस स्टेशन भातकुली येथे नेमणुकीस असल्यापासुन श्री प्रविण वांगे, पोनि व वरिष्ठांचे नावाचे दुरपयोग करुन अवैध धंदयाकडुन लाच स्वरुपात पैसे घेवुन अवैध धंदयांना बळ देत आहेत. तुम्ही अवैध रेती व्यवसाय करणा-या मकसुद खान गुलाम युनूस खान वय अंदाजे ३२ वर्ष रा.खोलापुर यांचे कडुन रु.५०००/- लाच स्वरुपात घेतल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे.

तुम्ही तुमच्या कर्तव्यामध्ये कसुर केलेला आहे. तरी तुमचे बेशिस्तीचे वर्तन पाहता पोलीस खात्याची प्रतिमा मलीन करणारे आहे. तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या

दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुन तुम्ही तुमचे कर्तव्यात निष्काळजीपणा/बेजबाबदारपणा केला असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक २३/०७/२०२४ रोजी मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेतले असुन व सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरी बाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. २०००/- (अक्षरी दोन हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखे पासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## निरंक

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस